E-985 241

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828
मालमत्ता व्यवस्थापन विभाग

25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

पुण्यश्लोक 300

जा.क्र. मनपा/मा.व्य.वि./निविदा/ ३९४ /2026-27 दि.28/ ०१/2026

प्रति,
**जनसंपर्क अधिकारी**
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- निविदा सुचना प्रसिध्दीबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका वृत्तपत्रात प्रसिध्द करावयाची निविदा सुचना सोबत जोडलेली असून सदर कामाचा अंदाजित खर्च रू.5,00,000/- च्या आत इतका आहे. सदर जाहिर सुचना हे पत्र मिळाल्यापासून दोन दिवसात वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

**शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सोबत** -निविदा सुचना

PC-1/2026-27/PK/निविदा-2/1



Scanned with OKEN Scanner

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता (मा.व्य.वि.) यांचे कार्यालय
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - 401 101
जा.नं. मनपा/मा.व्य.वि./ 398/2026-27
दि.28/ 09/2026

## // जाहिर निविदा सुचना क्र.398//

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी (पेणकरपाडा) स.क्र. 116(46)/1,2(पै.), स.क्र. 115(48)/18पै., 19पै., 20पै., 22पै., 23पै. या जागेतील दुकान गाळे दैनंदिन संचलन, देखभाल करीता भाडेतत्वावर देणेकामी इच्छुक विक्रेते यांनी दि.07/ 10/2026 रोजी दुपारी 02:00 वाजेपर्यंत सदर निविदेचे फॉर्म अटीशर्तीसह मालमत्ता व्यवस्थापन विभागात उपलब्ध होतील.

सदर निविदा फॉर्म रू.1100/- जी.एस.टी. रू.198/- इसारा रक्कम रू.10,000/- रोखीने दि.07/10/2026 रोजी 12:00 वाजेपर्यंत भरून त्याची पावती निविदा सोबत जोडणे बंधनकारक आहे. सदर इच्छुक विक्रेत्यांचे सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज बंद लिफाफ्यामध्ये दुसरा मजला, जुने प्रभाग कार्यालय, पोलीस स्टेशन लगत, भाईदर (प.) मालमत्ता व्यवस्थापन विभाग येथे दि.08/10 /2026 रोजी दु. 12:00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

सदरील निविदा शक्यतो त्याच दिवशी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्यास उघडण्यात येईल.

| अ.क्र. | मालमत्तेचे नाव | उपलब्ध गाळयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी (पेणकरपाडा) स.क्र. 116(46)/1,2(पै.), स.क्र. 115(48)/18पै., 19पै., 20पै., 22पै., 23पै. या जागेतील दुकान गाळे | 08 गाळे |

मा. महासभा दि.13/08/2026 ठराव क्र. 59 अन्वये मार्केट / मंडईतील गाळे भाड्याने देणेबाबत प्रस्तावित धोरण ठरविण्यात आले आहे.

1. एकूण 08 गाळयांचे भाडे प्रति चौ.फु. / चौ.मी. क्षेत्रफळानूसार प्रतिमाह खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | गाळा क्र. | एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.) | मासीक भाडे (रु.) | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | गाळा - 1 | 11.62 | 4,477/- | 1,00,000/- |
| 2 | गाळा - 2 | 20.72 | 7,983/- | 1,00,000/- |
| 3 | गाळा - 3 | 13.21 | 5,128/- | 1,00,000/- |
| 4 | गाळा - 4 | 11.62 | 4,477/- | 1,00,000/- |
| 5 | गाळा - 5 | 08.47 | 3,263/- | 1,00,000/- |
| 6 | गाळा - 6 | 08.47 | 3,263/- | 1,00,000/- |
| 7 | गाळा - 7 | 08.95 | 3,448/- | 1,00,000/- |
| 8 | गाळा - 8 | 24.81 | 9,558/- | 1,00,000/- |

सदर मासिक भाड्यावर अधिक 18% प्रमाणे GST लागू राहील, प्रतिवर्षी सदर भाड्यात 5% वाढ करणेत येईल. अथवा महापालिका वेळोवेळी त्या बाबत निर्णय घेईल.

2. गाळे 03 वर्षाच्या भाडेपट्टा कराराने देणेत येईल. पुढील मुदतवाढ देणेचे अधिकार महापालिकेने राखून ठेवलेले आहे.
3. सदर गाळयात अर्जदार व त्यांचे कुंटुबीय यांनाच फक्त व्यवसाय करता येईल.
4. सदरचा गाळा महापालिकेच्या परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही, वारसाच्या नावे जागा हस्तांतरीत करण्यास महापालिकेची परवानगी घ्यावी लागेल.
5. विक्रीचा माल फक्त देण्यात आलेल्या गाळयामध्ये ठेवावा अन्य मोकळ्या जागेचा वापर त्यासाठी करू नये.

Scanned with OKEN Scanner

6. सदर गाळ्याची दुरुस्ती व निगा हे मंजूर गाळाधारकाने स्वखर्चाने करावयाची आहे, मात्र सदर गाळ्यात कोणत्याही प्रकारचा फेरबदल करावयाचा नाही. दुरुस्तीसाठी महानगरपालिकेची मंजूरी घेणे आवश्यक आहे.
7. सदर गाळ्यात स्पोटक किंवा ज्वालाग्राही सामान ठेवता येणार नाही.
8. विक्रीस ठेवलेल्या मालाचा निरुपयोगी भाग अगर कोणत्याही प्रकारची घाण गाळ्यामध्ये ठरविलेल्या जागीच टाकली पाहिजे, इतरत्र कोठेही ठेवता येणार नाही.
9. सदर गाळा धारक किंवा नोकर हा संसर्गजन्य रोगापासून मुक्त असला पाहिजे.
10. वेळोवेळी गाळाधारकांची अगर त्याचे सेवकांची शारिरीक तपासणी व विक्री करिता ठेवलेल्या मालाची तपासणी महापालिकेचे आरोग्य अधिकारी अगर महापालिकेने पाठविलेल्या अन्य अधिकारी यांना करण्याचा अधिकार राहील.
11. कोणत्याही गाळाधारकाला गिऱ्हाईकांच्या आकर्षणाकरीता जोरजोराने ओरडण्यास मनाई आहे. तसेच कर्ण/ कर्कश ध्वनीचा व त्यासंबंधी साहित्याचा उपयोग करता येणार नाही, तसे केल्यास त्याला जागा रिकामी करावी लागेल.
12. सदर गाळ्याची दिलेली मुदत संपताच गाळ्याची मालकी महापालिकेची असेल. त्याबद्दल कोणताही हक्क व नुकसान भरपाई मागता येणार नाही.
13. गाळाधारकांनी गाळ्याचे भाडे दर महिन्याच्या 10 तारखेच्या आत महापालिकेकडे आगाऊ भरले पाहिजे. दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधीचे भाडे थकीत राहिल्यास महापालिका कोणतीही पूर्व सुचना न देता महापालिका गाळा ताब्यात घेईल.
14. अर्जदार संस्थेने गाळ्याची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन प्रत्येकी गाळ्यासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा, सदर गाळा जसा आहे तसा "As in where is" देण्यात येईल याची नोंद घ्यावी,
15. अर्जदाराने स्थानिक वास्तव्याचा दाखला (तहसीलदार कार्यालय) देणे बंधनकारक राहील.

अ) जे अर्जदार मासिक भाडे भरण्याचा पर्याय स्विकारतील अशा अर्जदार व्यक्ती संस्थांनी 11 महिन्याचे मासिक भाडे (डिमांड ड्राफ्ट /post dated cheque) द्वारे महानगरपालिकेस अदा करावे लागेल व सोबत अर्जदार / संस्थेचे ज्या बँकेत खाते असेल. (सध्या व्यवहार होत असलेले) त्या बँकेतील खाते क्रमांक व पासबुकातील पहिल्या पानाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

ब) अर्जदार संस्थेने ज्या दिवसापासून गाळा वापरण्याकरीता घेतला आहे. त्या दिवसापासून भाडे भरणा करणे बंधनकारक राहील. तसेच अर्जदार / संस्थेने दोन महिन्यापेक्षा जास्त भाडे थकीत केल्यास मासिक भाड्यानुसार दरमहा 2% प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

क) अर्जदार / संस्थेच्या त्या वर्षातील कामाचा आढावा घेऊन पुढील वर्षाकरीता मुदलवाढ देणे अथवा भाडेकरार रद्द करणे बाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त यांचा असेल. महापालिका मिळकतीमध्ये विदयुत व पाणी व्यवस्था नसल्यास अर्जदारास ती स्वतः करावी लागेल व त्याकरीता आवश्यक नाहरकत दाखला महापालिकेकडून देण्यात येईल.

16. गाळा भाड्याने उपलब्ध करुन देणेकरीता प्राप्त अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे किंवा एखादया अर्जदार / संस्थेने एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास अशा संस्थेस किती गाळे दयावे याबाबतचे अधिकार मा. स्थायी समिती यांना राहतील.
17. एका गाळयाकरीता एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास जास्तीचे दर असणारी निविदा स्विकारली जाईल.
18. अर्जदार हे यापूर्वी महानगरपालिकेचे थकबाकीदार असल्यास अश्या अर्जदारांचे अर्ज नाकारण्यात येतील व अर्जदारास अपात्र करण्यात येईल.

- **पात्रता निकष**

1) अर्जदाराने स्थानिक वास्तव्याचा दाखला (तहसीलदार कार्यालयाकडील) देणे बंधनकारक राहील.

2) अर्जदार / संस्था हे महानगरपालिकेचे कोणत्याही प्रकारचे थकबाकीदार नसावेत.

**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**ठिकाण : भाईंदर**
**दि.**



Scanned with OKEN Scanner